S. S. S. P's

**Vasundhara Kala Mahavidyalaya, 22 Mhada Jule, Solapur.**

NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE

(AFFILIATED TO SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR )

One Day Interdisciplinary International Conference on

# NEW TRENDS IN HIGHER EDUCATION

**26 March 2017**

SPONSORED BY
UNIVERSITY GRANTS COMMISSION
(WRO) PUNE

ORGANIZED BY


IQAC-VASUNDHARA KALA MAHAVIDYALAYA
JULE SOLAPUR

## MARATHI - I

CHIEF ORGANIZER
PRIN. DR. B. V. CHOUDHARI

CONVENER
MR. S. M. UGHADE

CO-CONVENER
MR. P. G. KOLHE



AJANTA
PRAKASHAN

Scanned by CamScanner

# मराठी अनुक्रमाणिका


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | बौध्द शिक्षण पध्दतीमधील मानवतावाद<br>गजानन रमेश तायडे | १-२ |
| २ | आजच्या उच्च शिक्षणातील बदलता प्रवाह<br>सोंदरमल रेखा राणुजीराव | ३-८ |
| ३ | पाली साहित्याचे आधुनिक अभ्यासक व साहित्य निर्मति<br>वैशाखी अरविद कांबळे | ९-१३ |
| ४ | भारतीय राष्ट्रवादी इतिहास लेखकांचे कार्य<br>Prof. Narayan Dattatray Bansode | १४-१७ |
| ५ | तक्षशीला व नालंदा विद्यापीठांची आजच्या शिक्षण प्रणालीला गरज<br>बेबीनंदा यादवराव पानपाटील | १८-२२ |
| ६ | कृषी विकासाच्या माध्यमातून आर्थिक विकास<br>प्रा. डॉ. अजित अष्टे | २३-२५ |
| ७ | सोलापूर जिल्ह्यातील डाव्या चळवळीचे सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य<br>डॉ. किशोर नागनाथ जोगदंड | २६-२९ |
| ८ | रासायनिक खते व किटकनाशके यांचा शेती क्षेत्रावर होणारा परिणाम<br>सारिका रोहमारे<br>डॉ. सय्यदा रुक्साना तब्बसुम<br>आर. बी. थेटे | ३०-३२ |
| ९ | लोकसाहित्य आणि धर्म<br>प्रा. डॉ. पद्माकर पिटले<br>प्रा. डॉ. सुभाष इंगळे | ३३-३५ |
| १० | उच्चशिक्षणातील नव प्रणाली आणि मराठी भाषा व साहित्य<br>प्रा.डॉ.मीनाक्षी देव | ३६-३८ |
| ११ | पाली साहित्य आणि लोक कल्याणाची भावना<br>मोरे दिपाली साहेबराव | ३९-४० |
| १२ | बौध्द धर्मातील सामाजिक क्रांतीचे हृदय<br>सविता सुभाष उबाळे | ४१-४२ |
| १३ | बँक क्षेत्रातील बदलते प्रवाह<br>श्री प्रकाश लालासाहेब देशमुख | ४३-४५ |
| १४ | राजकीय सिध्दांताची प्रासंगिकता<br>प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव | ४६-४९ |
| १५ | महाविद्यालयाच्या विकासात ग्रंथपालाचे योगदान<br>प्रा. डॉ. घ. ना. पांचाळ | ५०-५१ |




Scanned by CamScanner

आंतरराष्ट्रीय चर्चासत्र - २०१७
ROYAL-ISSN-2278-8158 - Impact Factor - 4.42

१४

# राजकीय सिध्दांताची प्रासंगिकता

**प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव**
विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक, पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय, देगलूर, ता. देगलूर, जि. नांदेड.

राज्यशास्त्र हे शास्त्राचे शास्त्र आहे असे राज्यशास्त्राचा जनक ॲरिस्टॉटल म्हणतो. ॲरिस्टॉटलची ही उक्ती वर्तमानातही सत्य सिध्द आहे. कारण वर्तमानातील मनुष्य जीवनाशी संबंधीत सर्व शाखा, अंग व विभागाचा राज्यशास्त्रीय संकल्पना व संस्थांशी फार जवळून संबंध येत आहे. स्वायत्त राज्यसंस्था आणि बाजाराभिमुख अर्थव्यवस्था हातमिळवणी करुन संगनमताने कार्य करत आहेत. शितयुध्दानंतर उदयास आलेल्या मुल्यविरहीत बाजाराभिमुख व्यक्ती, समाज व शासन व्यवस्थेच्या काळात राजकीय सिध्दांताचा अंत झाला अशी ओरड अनेक राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी केली होती. परंतु अशी ओरड करणाऱ्या अभ्यासकांच्या हे लक्षात येत नाही की, राजकीय सिध्दातांचा अपमृत्यु झाला या गृहितक किंवा निष्कर्षास सिध्द करण्यासाठी ज्या विचारांची मांडणी केली तो विचार म्हणजे एक सिध्दांतच आहे. त्याचा संबंध जर राज्यशास्त्रीय संकल्पना व मानवी राजकीय वर्तनाशी असेल तर त्यातूनही एक नवा राजकीय सिध्दांत जन्मास येतो.

वर्तमानातील नव्या जागतिक व्यवस्थेने तर राज्यशास्त्रात बहुसंस्कृतीवर, नवसंस्थावाद, नवउदारमतवाद, उत्तर-वर्तनवाद अशा अनेक राज्यशास्त्रीय सिध्दांताची मांडणी केली आहे. या सर्व सिध्दांतांना समजून घेतल्या शिवाय नवी बदलती व्यवस्था व तिचे प्रवाह समजतच नाहीत. प्रस्तुत लेखात राजकीय सिध्दांत आणि मानवी जीवनाशी निगडीत साध्या-साध्या प्रश्नांचा कसा संबां आहे हे स्पष्ट केले. मानवाच्या साध्या प्रश्नांला समोर ठेवून केलेल्या चिंतनातूनच उदारमतवाद, मार्क्सवाद या सिध्दांताचा उदय झाला. या सिध्दांताला आधार मानुन वर्तमानात शासन करणाऱ्या अनेक व्यवस्था व जगणारे व्यक्ति आहेत. त्यामुळे राजकीय सिध्दांत मृत पावत नसतात तर ते नेहमीच जीवंत असतात. मानवी जीवनात ते अविभाज्य भाग आहेत. स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

तर्कपूर्णरित्या विश्लेषण केलेल्या ज्ञानाच्या समूहास सिध्दांत म्हणतात. राजकारणाचा संबंध अनेक घटकांशी आहे, ज्यात व्यक्ति, समूह, वर्ग, राज्य, न्यायपालिका, नौकरशाही, प्रसारमाध्यमे ई. ॲण्ड्रयू हॅकर या राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी राजकीय सिध्दांताचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले की, राजकीय सिध्दांत चांगले राज्य आणि समाजास आवश्यक सिध्दांत आणि राजकीय व सामाजिक वास्तवाचा तटस्थपणे केलेल्या शोधाचा समन्वय आहेत. गुल्ड आणि कोलब यांनी राजकीय सिध्दांताचा अर्थ सांगताना स्पष्ट केले की, ती एक राज्यशास्त्राची उपशाखा आहे, ज्यात राजकीय तत्वज्ञान, राजकारणाचा नैतिक सिध्दांत, राजकीय विचाराचे ऐतिहासिक अध्ययन, शास्त्रीय मापदंड, राजकीय विचारांचे विश्लेषण आणि राजकीय व्यवहारातील विविध मतप्रवाह व त्यांचा व्यवस्थित विकास यांचा समावेश होतो. राजकीय सिध्दांताचा संबंध तत्वज्ञान व अनुभववादी दृष्टिने विचार करता राज्याच्या संघटनेशी आहे. या सिध्दांतात राज्य, राजकीय संस्थाविषयी स्पष्टीकरण, त्यांचे तत्वज्ञान या बाबतचा योग्य सल्ला देण्याचा प्रयत्न केला जातो. नैतिक तत्वज्ञानात्मक अभ्यास यात समाविष्ट असतो. राजकीय सिध्दांत मुख्यतः एक प्रक्रिया आहे, ज्यात अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. त्या प्रश्नांचे उत्तर शोधले जाते आणि मानवी प्राण्यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित काल्पनिक तथ्यांची रचना केली जाते. या सिध्दांतात प्रामुख्याने राज्याचे स्वरुप व त्याचा हेतू काय आहे ? राजकीय संघटनांचे साध्य, लक्ष्य आणि पध्दती विषयी कसे निर्णय होतात ? राज्य आणि मानवातील संबंध कसे आहेत व कसे असावेत ? या सर्व प्रश्नांची मांडणी राजकीय सिध्दांताच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत केली जाते.

राजकीय सिध्दांताकडे बऱ्याचदा राजकीय चिंतनाचा पर्याय म्हणून पाहिले जाते. परंतू त्या दोन्हींचा अर्थ वेगवेगळा आहे. राजकीय चिंतनात साधारणपणे राज्य आणि राज्याशी संबंधित प्रश्नांवर व्यक्ति किंवा व्यक्ति समूहाकडून केलेल्या चिंतन, सिध्दांत आणि मूल्यांचा समावेश होतो. या सर्वांचा आमच्या जीवनाशी संबंध असतो. राजकीय चिंतन कोणत्याही व्यक्ति समूहाकडून राजकारणाविषयी व्यक्त केलेले सामान्य



Scanned by CamScanner

विचार असतात. तर राजकीय सिध्दांत स्वयंपूर्ण एक विचार व सिध्दांत आहे. ज्यात विविध प्रश्नांचे उत्तर देणे, इतिहासाची व्याख्या करणे आणि भविष्याशी संबंधित घटनाविषयी पूर्वानुमान लावण्याचा प्रयत्न केला जातो.

तत्वज्ञानात सत्य आणि ज्ञानाचा शोध घेण्यासाठी कोणत्याही विषयाबाबत केलेल्या चिंतनाचा समावेश असतो. जेंव्हा तो शोध राजकीय विषयातील सत्य शोधण्याशी संबंधित असतो तेंव्हा त्यास आम्ही राजकीय तत्वज्ञान म्हणतो. राजकीय सिध्दांत राजकीय तत्वज्ञानाचा एक भाग आहे. राजकीय तत्वज्ञान अधिक व्यापक आहे. राजकीय तत्वज्ञान राज्य, शासन, राजकारण, स्वातंत्र्य, न्याय, संपत्ति, अधिकार, कायदा आणि कोणत्याही प्राधिकरणा मार्फत कायद्याला लागू करण्याशी संबधित प्रश्न, त्यांची निकड, शासनास वैध ठरवणारे निकष, शासनाने कोणते अधिकार व स्वातंत्र्याचे संरक्षण करावे, त्यांने कोणते रुप ग्रहण करावे, कायदा काय आणि का आहे, वैध शासनाप्रति नागरिकांचे कर्तव्य कोणते इ. प्रश्नांचे अभ्यास आहे. राजकीय तत्वज्ञानाचा संबंध समकालीन प्रश्नांशी नसून, मनुष्याच्या राजकीय जीवनाशी संबंधित सार्वभौम प्रश्नांशी असतो परंतू राजकीय सिध्दांतकारांची दृष्टि मुख्यतः समकालीन राजकीय जीवनावरच असते. त्यामुळे तो राज्याचे स्वरुप, हेतू इ.शी निडगीत प्रश्नांचे स्पष्टीकरण करण्यात व्यस्त असतो.

राज्यशास्त्र अभ्यासाचा एक व्यापक विषय आहे. राजकीय सिध्दांत त्याची एक उपशाखा आहे. राज्यशास्त्रात राजकीय चिंतन, राजकीय सिध्दांत, राजकीय तत्वज्ञान, राजकीय विचारधारा, संस्थात्मक किंवा रचनात्मक ढाचा, तुलनात्मक राजनीति, लोकप्रशासन, आंतरराष्ट्रीय कायदा आणि संस्था इत्यादींचा समावेश होतो. कांही अभ्यासकांनी राज्यशास्त्रास शास्त्र या अर्थाने विषद केले. त्यांच्या मते राज्यशास्त्राचा अभ्यास एक शास्त्र म्हणून विविध शास्त्रीय पध्दतीने केला जातो. राजकीय सिध्दांत जोपर्यंत राजकीय तत्वज्ञानाचा भाग आहे. तोपर्यंत तो राज्यशास्त्र नाही. कारण राज्यशास्त्रात अमूर्त आणि अंत:प्रेरणेतून निर्माण निकष आणि चिंतनास स्थान नाही. परंतु राजकीय तत्वज्ञान या वास्तव पध्दतींवर विश्वास ठेवून वाटचाल करतो. राजकीय सिध्दांत ना शुध्द चिंतन आहे, न शुध्द तत्वज्ञान आणि न शुध्द शास्त्र आहे.

कोणताही राजकीय सिध्दांत एका व्यक्तीची निर्मिती नसतो. जे त्याच्या नैतिक आणि बौध्दिक चिंतनावर आधारित असेल जेंव्हा तो आपल्या सिध्दांताचे प्रतिपादन असो तेंव्हा तो मानवाच्या राजकीय जीवनातील घटना संघटना आणि रहस्यांचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. ज्यास आपण सत्य मानू की न मानू परंतू त्यास एक सिध्दांत म्हणून सदैव मान्यता मिळते. राजकीय सिध्दांत सर्वसाधारणपणे मनुष्य जाती त्यामार्फत संघटित समाज आणि इतिहास व ऐतिहासिक घटनांशी संबंधित प्रश्नांचे उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. तो वाद-विवादाला मिटवण्याचे मार्ग सांगतो. तर क्रांतीचे समर्थन करतो. तर भविष्याविषयी अंदाज व्यक्त करतो. तसेच राजकीय सिध्दांत ऐतिहासिक घटनांना प्रभावित करुन त्यातील आपले योगदान स्पष्ट करतो. राजकीय सिध्दांतकार फक्त वर्णन करत नाहीत तर जे होत आहे व होणार आहे त्याबाबत उपाय सूचवते. राजकीय सिध्दांतास सामान्यतः कायदा आधार असतो. बऱ्याचवेळा अभ्यासाचा विषय तोच असतो. तसेच एखादा तत्वज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, धर्मतत्वज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ असो ते ही सिध्दांताचे निर्माते असू शकतात.

राजकीय सिध्दांतात ज्या प्रश्न व मुद्यांचा अभ्यास केला जातो किंवा ज्यांना महत्व दिले जाते, त्यात काळानूसार बदल होतो. अभिजात आणि प्रारंभिक राजकीय सिध्दांताचा संबंध नैतिकदृष्ट्या दोषमुक्त राजकीय व्यवस्थेचा शोध घेण्याशी आहे. त्यामुळे त्यांनी आपले विशेष लक्ष राज्याचे स्वरुप, हेतू, राजकीय सत्तेचा वापर करण्याचे आधार आणि राजकीय अवज्ञाच्या समस्येच्या प्रश्नांवर दिले. आधुनिक राष्ट्र-राज्यांचा उदय आणि आर्थिक संरचनेत झालेले बदल आणि औद्योगिक क्रांतीमुळे नवनवीन गरजा व प्रवाह समोर आले. त्यामुळे अभ्यासकांचे लक्ष व्यक्ति, व्यक्ती स्वातंत्र्य आणि समाज व राज्यांचे संबंध याकडे आकर्षिले. अधिकार, कर्तव्य, स्वातंत्र्य, समता आणि संपत्तीशी संबंधित प्रश्न महत्त्वपूर्ण बनले. दुसऱ्या महायुध्दानंतर एक नव्या प्रकारच्या अनुभववादी राजकीय सिध्दांताचा उदय झाला. यात मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास करणे आणि त्यांच्या आधारे सिध्दांत मांडून निष्कर्ष काढण्याचे प्रयत्न झाले. मानवी वर्तनाचा अभ्यास करणाऱ्या विद्वानांनी अभ्यासासाठी नवनवीन प्रश्नांचा आधार घेतला. उदा : राजकीय प्रणाली, अभिजन, समूह, राजकीय पक्ष इत्यादी. मागील दोन दशकात अनेक नवनवीन प्रश्न समोर आले. उदा : ओळख, लिंग, पर्यावरण, समुह इत्यादी यासोबतच मूल्यविरहित राजकीय सिध्दांचा उदय होत आहे. ज्यात स्वातंत्र्य, समता आणि न्यायाच्या



Scanned by CamScanner

आंतरराष्ट्रीय चर्चासत्र - २०१७
ROYAL-ISSN-2278-8158 - Impact Factor - 4.42

प्रश्नांवर नवीन पध्दतीने जोर दिला जातो. त्यामुळे प्रश्नांकडे सिध्दांताचा पाहण्याचा उदारमतवादी, मार्क्सवादी या दृष्टिकोणात बदल होत आहे.

मनुष्य सामाजिक प्राणी या नात्याने सहकार्याने समाजासोबत राहतो. ज्यात आम्ही संसाधन, रोजगार आणि सन्मान व सहकार्यास प्राधान्य देतो. मानवी समाजाचे ऐक्य आणि अखंडता किंवा समाजाच्या सामुहिक गरजांची पुर्तता करण्याचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी राजकीय सिध्दांत आवश्यक आहे. तसेच ते समस्यांचे समाधान शोधण्याचा प्रयत्न करतात. राजकीय सिध्दांताची प्रासंगिकता राज्याचे स्वरुप आणि हेतू प्रति राजकीय सत्तेचा आधार आणि शासनाचे सर्वांत चांगले संबंध आणि राज्य व व्यक्तिचे मुलभुत अधिकाराच्या संदर्भाने त्या दोघांतील संबंधाविषयीच्या विभिन्न दृष्टिकोणाचा विकास करण्यात निहित आहेत. याशिवाय राजकीय सिध्दांत राज्याच्या नैतिक गुणवत्तेची चाचणी करण्यासाठी नैतिक मापदंड स्थापित करणे आणि वैकल्पिक राजकीय व्यवस्थापन व व्यवहार सुचवण्याचे प्रयत्न करते. राजकीय संघटनांची व्याख्या आणि वर्णन करणे. तसेच हे संघटन आहे ते सांगणे या संघटनेची कोणत्या समुहासाठी उपयुक्त राजकीय लक्ष्य आणि कार्यवाहींची निवड करण्यात सहकार्य देणे व नैतिकतेची निवड करण्यात आधार प्रस्तुत करण्यासाठी राजकीय सिध्दांताची प्रासंगिकता आहे. वर्तमान काळात राज्य अधिकाधिक प्रमाणात गरीबी, भ्रष्टाचार, सजातीय किंवा वंशीय तणाव, पर्यावरण प्रदूषण इ. समस्यांचा सामना करत आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय मतभेदाच्याही समस्या आहेत. राजकीय सिध्दांत समाजाच्या राजकीय जीवनाची वर्तमान आणि भविष्यातील समस्यांचा अभ्यास करणे आणि त्या समस्यांचे समाधान शोधण्याचा प्रयत्न करते. वाढत्या गुंतागुंतीमुळे राजकीय सिध्दांताचे कार्य गंभीर बनत आहे. राजकारण अज्ञानी आणि स्वार्थी लोकांच्या हातातील स्वत:ची भूक मिटवण्याचे साधन बनणार नाही यादृष्टीने राजकारणाचे विश्लेषण करुन उपाय सांगण्याचा प्रयत्न केला जातो. जर आम्हाला सामाजिक वास्तव, आदर्श आणि राजकीय तत्वज्ञानास लक्षात ठेवायचे असेल तर राज्याचे स्वरुप आणि प्रयोजन, शासनाच्या समस्यांवर व्यवस्थितरित्या विचार करण्यासाठी आम्हाला समस्यांचे सैध्दांतिक अध्ययन करण्याचा मार्ग स्विकारावा लागेल. अशा प्रकारे राजकीय सिध्दांत प्रासंगिक आहे. याशिवाय व्यक्तिगत स्तरावर राजकीय सिध्दांताचा अभ्यास केल्याने आम्हाला आपल्या अधिकार व कर्तव्याची माहिती मिळते. गरीबी, हिंसा, भ्रष्टाचार, इत्यादी सामाजिक समस्यांना समजुन घेण्यास मदत मिळते. विभिन्न राजकीय सिध्दांताला आधार मानुन आपण समाजात बदल करण्याचे उपाय व दिशा देण्याचा मार्ग सुचवू शकतो. ज्यामुळे आदर्श समाज स्थापन करता येईल. जर एखादा राजकीय सिध्दांत योग्य असेल तर सामान्य लोकांपर्यंत पोहोचवता येतो. तेंव्हा राजकीय सिध्दांत समाज आणि मानव जातिला प्रगतिपथावर घेवून जाणारी एक शिला बनते.

राज्यशास्त्रात राजकीय सिध्दांतासोबत राजकीय चिंतनाचा अभ्यास केला जातो. कारण राजकीय चिंतनाचा संबंध राज्य आणि त्यांचे धोरण, निर्णय आणि कार्यन्वयाशी आहे. राज्यशास्त्र, राजकीय सिध्दांत, राजकीय चिंतन आणि राजकीय तत्वज्ञान या वेगवेगळ्या शब्दांचा वापर सर्व काळातील अभ्यासकांकडून एकाच अर्थाने केला नव्हता. लोकपातळीवर त्याचा वापर परस्परांचा पर्यायी म्हणून केले जाते. या सर्वांत अधिक सर्वमान्य वापर राजकीय चिंतनाचा होतो. ज्याचा वापर सहजपणे कायद्याचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी केला जातो. यामुळे राज्यशास्त्र आणि राजकीय तत्वज्ञान उपशाखा बनतात. राजकीय चिंतनात सदाचार, धोरण आणि नैतिक दर्शन, धर्म तत्वज्ञान, मानवीय विकासात राजकारणाची भूमिका आणि राजकीय क्रियान्वयात्मकता यांचा समावेश असतो. राजकीय चिंतनाच्या अभ्यासाची सर्वांत चांगली पध्दती कोणती यांचे उत्तर मिळते.

कोणत्याही सामाजिकशास्त्राचा अभ्यास त्या विषयाच्या ऐतिहासिक विकासाला समजून घेतल्याशिवाय करता येत नाही. आज आम्हाला ज्या राजकीय संस्था आणि राजकीय वर्तनाच्या प्रणाली पाहण्यास मिळतात त्या अनादिकाळाच्या विकासाचा परिणाम आहे. राजकीय अभ्यासकांना या विकासाला समजण्यासाठी इतिहासाचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. त्यांना अनेक सण-उत्सव, राजे-महाराजांशी संबंधित मनोरंजक ऐतिहासिक कथा, लढाया व त्यांच्या जीवनशैलीचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. तसेच आर्थिक संरचनांचा विकास आणि त्यातील परिवर्तन, औद्योगिक क्षमतांचा विकास आणि त्यात आलेल्या बदल आणि राजकीय संस्था व शासनाच्या कार्यपध्दतीवरील त्यांच्या प्रभावाचा अभ्यास करावा लागेल. सामाजिक वर्ग, आर्थिक प्रक्रिया दोन-चार दिवसांत निर्माण होत नाहीत. त्यांना त्यांच्या समकालीन वास्तवापासून दूर काढून समजून घेत येत नाही. मनुष्य, समाज आणि राजकीय संस्थात विकसित होणाऱ्या संबंधांना समजुन घेण्यासाठी राजकीय चिंतनाच्या इतिहासाचा [illegible]स करणे आवश्यक आहे. भूतकाळातील राजकीय चिंतकाचे विचार आणि सिध्दांताचा अभ्यास आम्हाला आपल्या काळातील प्रचलित

Scanned by CamScanner

राजकीय धारणाच्या पुढे जाबून पाहणे आणि भूतकाळातील बौध्दीक संसाधनास ग्रहण करण्याची क्षमता प्रदान करते. भूतकाळातील अभ्यासकांच्या चिंतनावर विचार केल्याने आम्हास वास्तविक तत्वाने मार्गदर्शन प्राप्त होते. राजकीय सिध्दांत सहज निर्माण होत नसून त्याची रचना भूतकालीन लेखकांच्या धोरणांची निर्मिती, विस्तार आणि विकास यावरुन करता येते. यामुळे भूतकालीन आणि वर्तमान धोरणांतील तुलना करणे आणि त्यांच्या संबंधाने निर्णय घेणे शक्य होते. विचारप्रणाली राजकीय चिंतनाचा अविभाज्य भाग आहे. इतिहासाचा आधार घेवून पूढे जातो अशा सिध्दांताची निर्मिती करणे शक्य आहे. इतिहासाचा जेवढा सदुपयोग होतो तेवढाच दुरुपयोग ही होतो. परंतु सिध्दांताच्या निर्मितीला आधार देण्यासाठी त्याचा वापर सदैव करण्यात आला.

**संदर्भ ग्रंथ :**

१) राजकीय सिध्दांत - प्रा.दिगंबर आ.खेडेकर
२) उच्चतर आधुनिक राजकीय सिधंत - डॉ.एस.बी.फड.
३) प्रमुख राजकीय विचारप्रणाली - डॉ.यु.डी.सावंत, प्रा.प्रभाकर सुर्यवंशी.
४) राजनीतिक सिध्दांत - NCERT.
५) राजनीती सिध्दांत की रुपरेखा - ओ.पी.गाबा.
६) आधुनिक राजनीतिक सिध्दांत - डॉ.पुखराज जैन.

Scanned by CamScanner